Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# मराठवाड्यातील दुष्काळ आणि शाश्वत उपाययोजना

**निता गणेश जाधव**

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र राज्याचा एक भौगोलिक विभाग म्हणून 'मराठवाडा' ओळखला जातो. मराठवाड्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ६४.६० लाख हेक्टर असून विभागात एकूण आठ जिल्ह्यांचा समवेश होतो. शेती हा येथील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे लोकांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेतीच आहे. शेती पावसावर अवलंबून असून जवळपास ८५% शेती कोरडवाहू आहे. गेल्या काही वर्षामध्ये पावसाचे अत्यल्प प्रमाण, कधी अतिवृष्टी, तर कधी गारपीट, वेळी-अवेळी पडणाऱ्या पावसामुळे होणारे शेतीचे नुकसान, रोगराई, टोळधाडी इ. भौतिक कारणामुळे शेतीचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकरी अगदी मेटाकुटीला आलेला आहे. भौतिक कारणाबरोबरच मानवी घटकही बऱ्याच अंशी शेती आणि शेतकऱ्यांच्या जिवाशी आलेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने भांडवलाची कमतरता, कृषीमालाचे अयोग्य किंमतधोरण, आधुनिक उत्पान तंत्राचा अभाव, सदोष पीकरचना, संकरीत बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यातील फसवेगिरी व वाढत्या किमती इ. चा समावेश होतो. भौतिक आणि मानवी घटकामुळे मराठवाड्यातील नव्हे तर संपूर्ण भारतातील शेती एका अभूतपूर्व संकटात सापडलेली दिसून येते. या सर्व पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील दुष्काळाची वास्तविकता आणि त्यावरील शाश्वत उपाययोजनांच्या हेतुने प्रस्तुत विषय प्रतिपादन करत असून त्यासाठी संशोधन साहित्य म्हणून दुय्यम साधनसामग्रीचा अवलंब केला आहे. थोडक्यात प्रस्तुत लेखातून मरठवाड्यातील दुष्काळाची दाहकता मांडून त्यावरील उपाययोजनांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**पर्जन्यमान :**

महाराष्ट्राचे पर्जन्यमानाचे प्रमाणानुसार साधारणपणे तीन विभाग आहेत. जास्त पर्जन्याचा प्रदेश, मध्यम पर्जन्यमानाचा प्रदेश आणि कमी पर्जन्याचा प्रदेश. पर्जन्यमानाचा विचार करता मराठवाडा विभाग हा कमी पर्जन्याच्या प्रदेशात येतो. म्हणजे मराठवाडा अवर्षण प्रवण प्रदेश किंवा कायम दुष्काळी प्रदेश म्हणून ओळखला जातो. मराठवाड्यावर नेहमीच पावसाची वक्रदृष्टी राहिलेली दिसून येते. गेल्या काही वर्षात पावसाची परिस्थिती फारच गंभीर बनलेली आहे. सर्वसाधारणपणे मराठवाड्यातील पावसाची वार्षिक सरासरी ७७४ मिमी इतकी आहे. काही वर्षाचा अपवाद वगळता मराठवाड्यात सरासरीपेक्षा कमीच पाऊस पडत असल्याचे पुढील आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

**मराठवाड्यातील सरासरी पर्जन्यमान (टक्केवारी)**

| विभाग | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ | २०२० | २०२१ | २०२२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठवाडा | ५३ | ५६ | ८० | ९१ | ११८ | १०७ | ७९ | ८९ | १०३ |

तक्त्यातील आकडेवारीवरुन स्पष्ट होते की, २०१४,२०१५,२०१६ या कालावधीत मराठवाड्यातील सरासरी पर्जन्यमान अनुक्रमे ५३%,५६% व ८० % एवढे होते २०१७ नंतर पाऊसचे प्रमाण वाढले असले तरी त्यामध्ये देखील पावसाची अनियमितता म्हणजे एकदाच किंवा एखाद्या दिवशी महिन्यात जास्त पाऊस पडतो. त्यामुळे दुष्काळ कायम राहतो. वेगवेगळ्या जिल्ह्यात पुन्हा पावसाचे प्रमाण वेगवेगळे आहे. सन २०२० आणि २०२१ मध्ये मराठवाड्यात अनुक्रमे केवळ ७९ % आणि ८९ % पाऊस झाला. अर्थात या दोन्ही वर्षातील हा पाऊस एकूण पाऊसकाळाच्या १५ ते २० दिवसातच झालेला आहे.

**दुष्काळ म्हणजे काय ?**

महाराष्ट्रात कृषी हवामान विभाग पाडताना पर्जन्यमान, तापमान, जमिनी, नैसर्गिक वनसंपदा इ. चा एकत्रित विचार केलेला असतो. त्यानुसार राज्यात नऊ कृषी-हवामान विभाग पडतात. त्यापैकी तीन विभागात मराठवाडा प्रदेश येतो.

सरासरी पर्जन्यमान ५०० ते ७०० मिमी असणारा भू-भागास अत्यंत कमी पाऊस, ७०० ते ९०० मिमी पर्जन्यमान असणारा भू-भाग मध्यम स्वरुपाचा तर १०० ते १२५० मिमी पर्जन्यमान असलेल्या भू-भागास जास्त पावसाचा भू-भाग म्हणतात. सरासरी पर्जन्यमान ७५० मिमी पेक्षा कमी असलेल्या भू-भागास अवर्षण प्रवण क्षेत्र म्हणतात. मराठवाडयातील परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यातील काही भू-भाग पगळता बाको जिल्ह्यातील बहुतांश भाग अवर्षणप्रवण क्षेत्रात मोडतो."ज्या प्रदेशात ५०-७५ से.मी. पाऊस पडतो तो प्रदेश दुष्काळी प्रदेश म्हणून ओळखला जातो."
सुखधनकर समितीच्या मते, "ज्या प्रदेशात वार्षिक सरासरी ७५० मिमी पेक्षा कमी पाऊस पडतो तो भू-भाग म्हणजे अवर्षणप्रवण भाग होय"

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या मते, "ज्या भागात नेहमीच्या वार्षिक सरासरी पर्जन्याच्या ७५% किंवा त्याहून कमी पर्जन्यवृष्टी झाल्यास तो भाग तीव्र अवर्षणाचा तर ५०% पेक्षा कमी पर्जन्यवृष्टी झाल्यास त्यास अतितीव्र अवर्षण समजावे " थोडक्यात अवर्षण ही पर्यावरणातील वातावरण व हवामान यामुळे निर्माण होणारी परिस्थितो (आपत्ती) आहे. एखाद्या प्रदेशात सातत्याने सरासरीपेक्षा खूप कमी/नगन्य स्वरुपात पाऊस पडणे म्हणजे अवर्षण होय. या दशकात अशा परिस्थितोला मराठवाडा सातत्याने सामोरा जात आहे. यामुळे मराठवाडयातील शेती आणि शेतकरी होरपळून निघत आहे. शेतीशी निगडीत असणारे सर्वच पटक एक प्रकारची मोठी अस्वस्थता अनुभवत आहेत. परिणामी शेती, उद्योग, व्यापार, रोजगार, पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, वाढता कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार यांच्यात अस्वस्थता निर्माण झाल्यामुळे आत्महत्या सारखे प्रकार मोठ्या प्रमाणात बाढले आहेत.

१९७२ च्या दुष्काळाची आठवण काढली तरी आजही अंगावर शहारे येतात. तेव्हा अन्नधान्याची टंचाई होती मात्र पिण्याच्या पाण्याचे प्रश्न नव्हता. आन अन्नधान्याचा प्रश्न नाही परंतु पिण्याचे पाणीच उपलब्ध नाही. पाणी जीवन आहे म्हटल्यानंतर पाणीच नसेल तर... अर्थतज्ञ ॲडम स्मिथ म्हणतात, "पाण्यावाचून माणूस तडफडतो. परंतु पाण्याला कवडीची किंमत नाही. हिन्याचा अनिवात उपयोग नसून तो अनमोल आहे. हा मानयो संस्कृतीकरता क्रूर विरोधाभास आहे." म्हणून आता दुष्काळ म्हणजे काय? हे सांगण्याची कोणालाही गरन नाही. त्यामध्ये आता आपण एवढेच करु शकतो की या दुष्काळाची किंवा अवर्षणाची किंवा नैसर्गिक संकटाची तीव्रता कमी कशी करता येईल आणि त्यासाठी काय करायला पाहिजे यादृष्टीनेच विचार करणे आवश्यक आहे."आर्थिक दृष्टीतून शेतकरी कर्जबाजारी नाही. उलट भांडवलदार, व्यापारी, उद्योजक आणि सरकार यांना शेतकऱ्यांनी इतके प्रचंड कर्ज दिलं, की तेवढं कोणतंही सरकार देऊ शकणार नाही यांची (शोषकांची) कमाल ही, की यांनी शेतकऱ्यांच कर्ज परत न करता बुडवलं आणि उलट शेतकऱ्यांनाच कर्जबाजारी म्हणून घोषित केलं." डॉ. पंजाबराव देशमुख

'सर्व खरेदी किरकोळ विक्री करणाऱ्या दुकानांतून आणि सर्व विक्री ठोक दुकानातून करणारा एकमेव उत्पादक म्हणजे शेतकरी' - **जॉन केनेडो.** 'अवहेलना आणि अपमान याचा हमखास मानकरी तो आपला शेतकरी.' सत्ताधारी व विरोधी पक्षातील लोकाप्रतिनिधी आणि प्रशासकीय मंडळीच्या दृष्टीने दुष्काळ म्हणजे पर्वणीच! हजारो कोटीचा निधी आणावा आणि तो चाटून घ्यावा ही त्यांच्या दृष्टीने दुष्काळाची उपलब्धी. त्यामुळेच पो. साईनाथ म्हणतात, "दुष्काळ आवडे सर्वांना." दुष्काळ असो या सुफाळ, कोणतेही पीक घेणारा असो, यावर कोणताही शेतकरी समाधानी नाही. तरुण पिढी शेतावर पाय ठेवायला तयार नाही. संधी मिळाली तर ५०% शेतकरी शेती सोडण्याच्या मनस्थितीत आहेत. शेती म्हणजे हमखास तोटा अशी परिस्थितीत कवी इंद्रजित भालेरावांनी आपल्या कवितेतून असा सवाल केला को "सांगा माझ्या बापाने नाही केला पेरा. तर तुमरो काय खाल, धतुरा?" मनुष्यबळ, बुध्दिमत्ता आणि आर्थिक पाठबळ यांचा मिलाफ झाला तरच गावांचा विकास होऊ शकतो याची स्पष्ट कल्पना महात्मा गांधीजींना होती म्हणूनच त्यांनी 'गावाकडे चला' हा संदेश दिला होता. आपल्या शहरी दोस्तांना गावाची आणि पर्यायाने शेतकऱ्यांसमोरील समस्यांची जंत्री पाहण्यासाठी एका कवितेतून कयी इंद्रजित भालेराव म्हणतात, 'काटमाकुट्याचा तुडबित रस्ता, गावाकडं चल माझ्या दोरता.' या कवितेला दशक उलटले तरी गावाकडील आयुष्य अजूनही काट्यांनीच भरलेलं आहे.विसाव शतक हे तेलाचे होते. एकविसावं शतक पाण्याचं आहे. सध्या तेलापेक्षा बाटलीबंद पाण्याची किंमत जास्त आहे. तेलासाठी उर्जेचे इतर पर्याय तरी उपलब्ध

आहेत. परंतु पाण्याला पर्याय नाही. पाण्याचे साठे वाढविणे, पाणी कळविणे, पाणी निविणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे अशा गोष्टीला अतोनात महत्त्व प्राप्त झालं आहे.

**शाश्वत उपाययोजना** :

गरिबीत जन्म घेणे वाईट नाही. पण कायम गरीब राहणे हे वाईटच आहे. गरिबीत जन्म झाला तरी कठोर परिश्रमांच्या जोरावर ती परिस्थिती बदलता येते तसेच दुष्काळाचेही आहे. नैसर्गिक आपत्ती आहे म्हणून दुष्काळाकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा दुष्काळावर मात करण्याचे प्रयत्न सदोदित व्हायला हवेत. दुष्काळ अथवा शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे विषय केवळ चितनाचे न राहता ते कृतिशीलतेचे ही बनायला हवेत. दुष्काळाची चर्चा खूप झाली. दुष्काळामुळे काय परिणाम होतात हेही आपणा सर्वांना माहित आहे. दुष्काळी परिस्थिती कशामुळे वारंवार उद्धवते याचीही जाणीव आपल्याला आहे. त्यामुळे आता दुष्काळाची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने समाजातील सर्वच घटकांनी कृती करण्याची वेळ आलेली आहे. शासन आणि समाजाने एकत्रितपणे पुढील बाबीवर लक्ष केंद्रित केले तर दुष्काळावर मात करता येऊ शकते.

१. मराठवाडयात कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याची संख्या भरपूर आहे. त्यापैकी केवळ दुरुस्तीअभावी हे बंधारे वापराविना पडून आहेत. अशा बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि देखभाल नियमित केली तरी हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊ शकते.

२ महाराष्ट्र जल व सिंचन (चितळे) आयोगाने १९९९ साली नदीखोरे उपखोरेनिहाय जलविकास व व्यवस्थापन आणि समन्यायी पाणी वाटपाकरिता महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. त्यानुसार कायदे केले. जलनिती व कायद्यांना अभिप्रेत असलेली जल सुशासन व नियमन व्यवस्था उभीच राहिलो नाही. चितळे आयोगाच्या शिफारशोहो शासनाने अद्याप स्वीकारलेल्या नाहीत. महाराष्ट्रात आन एकाचवेळी नऊ सिंचनविषयक कायदे आहेत. पापैकी बऱ्याच कायद्यांचे नियम अद्याप तयार नाहीत. या कायद्यांच्या माध्यमातून 'एकात्मिकृत राज्य जल आराखडा तयार करायचा होता. परंतु अद्यापही तो तयर नाही. चितळे आयोग आणि सिंचनविषयक विशेष चौकशी समितीच्या अहवालाद्वारे जलक्षेत्रात पुनर्रचना व सुधारणाबदल किमान विचारमंथन जरी सुरु झाले तरी जलअभियान पूर्ण होईल.

३. पाणी व भिजलेले क्षेत्र मोजण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जावा. विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील पाणो प्रश्नाविषयी आंतरशाखीय दृष्टिकोनातून कृती-संशोधन प्रकल्प हाती घेणे बंधनकारक करावे. सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमात 'पाणी' हा विषय अनिवार्य करावा.

४. जलक्षेत्रात सार्वजनिक गुंतवणूकीतून निर्माण झालेल्या मत्तांची व्यावसायिक दृष्टिकोनातून देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापण करण्यासाठी नवीन व्यवस्था निर्माण करावी.

५. राज्यातील विपुलतेच्या खोऱ्यातून तुटीच्या खोऱ्यात पाणी परिवहन करुन आणणे.

६ भारत सरकारच्या 'कृषी आणि सहकार मंत्रालयाने २००९ मध्ये प्रसिध्द केलेल्या 'दुष्काळाचे व्यवस्थापन या विषयावरील पुस्तकातील उपाय याबाबतची माहिती जनतेसमोर आणावी.

८. 'मनरेगा' रोजगाराची हमी देते. कागदोपत्री रोजगारही मिळतो. विविध अभ्यासकांच्या पाहणीतून मनरेगाची दुरावस्था समोर आली आहे. तेव्हा मनरेगाची अंमलबजावणी जरी प्रामाणीकपणे आणि काटेकोररितीने झाली तरी ग्रामीण भागाचा खरोखरच कायापालट होण्याची क्षमता या योजनेत आहे. या योजनेंतर्गत रोजगाराची कामे काढताना सामुहिक गरजेची, मृसंधारण व पाण्याच साठे साफ करणे, त्यातील गाळ काढणे, लघुसिंचन योजनेची दुरुस्ती, नाला बंडिंग, गावातील प्रवाह बंद पडलेली नदी, नाले, ओहोळ जिवंत करणे, शेततळी बांधणे, जमिनीची धूप थांबविणे अशा स्वरुपाची असावीत.

९. सिंचन परिषदेने आपल्या आतापर्यंतच्या १६ सिंचन परिषदांमधून ठिबक संचाच्या अनुदानात वाढ, सिंचन व्यवस्थापन याबाबतीत केलेल्या शिफारशींची दखल घेतली जावी.

१०.राज्यात चार-पाच विभागाकडून पाणलोट व जलसंधारणाचे उपक्रम राबविले जातात. या सर्वात सुसुक्षता आणण्यासाठी जलसंधारण आयुक्तालय मराठवाड्यात स्थापन करावे.

११.जलसिंचन अनुशेषासाठी विदर्भाप्रमाणे मराठवाड्याला एक हजार कोटी रुपये द्यावेत. संपूर्ण मराठवाड्यात पणलोट क्षेत्र विकासाचा कालबध्द कार्यक्रम राबविणे.

१२.शेती आणि शेतकऱ्यांशी संबंधीत सर्व घटकांना शिक्षण आणि प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन द्यावी. यासाठी कृषी विद्यापीठे महत्त्वाची भूमिका बजाऊ शकतात. नियोजनबध्द पाणी व्यवस्थापन, ठिबक व जलतुषार पध्दती, पाणलोटक्षेत्र विकास, मृदसंधारण व जलसंधारण, वनीकरण योजना, पौकरचना, पौक नियोजन, पीकसंरक्षण, जैविक खतांचा वापर, माती परीक्षण, बदलते हवामान, योग्य तंत्रज्ञान यासारख्या बाबींचा प्रशिक्षणात समावेश करावा.

१३. २००४ साली पहिला शेती आयोग शेतीशास्त्रज्ञ एम.एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केला. आयोगाने आपला अहवाल २००७ साली सादर केला. अहवालातील निष्कर्ष असे ११% शेतकरी भूमिहीन आहेत. ४०% शेतकऱ्यांना एकरपेक्षा कमी जमीन कसावी लागते. ३४% शेतकऱ्यांकडे १ ते ५ एकर जमीन आहे. केवळ १२.६% शेतकरी पाच एकरपेक्षा अधिक जमीन बाळगून आहेत. पाहणीतील ही माहिती सांगून स्वामीनाथन जमिनीची पुनर्रचना करण्याचे अवाहन करतात. 'लागवडीखालील जमीन व जंगलाचा अकृषी कारणांकरिता उपयोग रोखला पाहिजे. विशेष आर्थिक क्षेत्रापेक्षा (स्पेशल इकॉनॉमिक झोन) विशेष कृषी क्षेत्र (स्पेशल ॲग्रीकल्चर झोन) अत्यंत महत्त्वाचे आहेत. अत्यल्पभूधारक व भूमिहीनांना पडीक जमीन कसण्यास द्यावी. जंगलात राहणाऱ्यांना, आदिवासींना वनसंपत्तीचा लाभ घेऊ द्यावा. जमिनीचा आकार, खरेदीचा उद्देश व खरेदीदार यांचं स्वरुप विचारात घेऊन शेतजमिनीच्या विक्रीवर नियंत्रण आणलं जावं.'

१४. पिकांना संरक्षण देण्यासाठी पीक विमा योजना प्रभावीपणे कार्यान्वीत करावी. यादृष्टीने राधाकृष्ण समितीने पीक विमा योजना प्रभावी करण्याचे सूचविले होते. पीक विमा योजना साधी सरळ तसेच किमान विमा हप्ता असणारी असावी. त्यामध्ये अधिकाधिक पिकांचा समावेश असावा. खरीप व रब्बी पिकांसाठी वेगवेगळी योजना असावी. दुष्काळ, अतिवृष्टी तसेच दोषपूर्ण बियाणे इ. मुळे होणाऱ्या नुकसानीचा अंतर्भाव योजनेत असावा. शेतकऱ्यांना विमा योजनेतील सर्व तांत्रिक बाजू समजल्या पाहिजेत आणि नुकसान भरपाईची रक्कम त्वरित मिळाली पाहिजे. असे असूनही अजूनही सर्व पिकांच्या बाबतीत पीक विमा नाही. सरकारनेच गेल्या वर्षी जो पाहणी केली त्यानुसार ९०% शेतकरी विम्यापासून दूर आहेत, अनेकांना विमा म्हणजे काय हे माहितही नाही. अलिकडील काळात खासगी कंपन्या पीक विमा क्षेत्रात आल्या आहेत व त्या शेतकऱ्यांना नाडण्यात आणि फसवण्यात आघाडीवर आहेत. नुकताच छत्तीसगडमध्ये पीक विमा घोटाळा उघड झाला आहे. पीक विम्याचा हप्ता मोठा आहे. पीक विम्याची रक्कम मिळत नाही. या बाबींकडे गांभीर्याने बघण्याची गरज आहे.

१५.सध्याच्या दुष्काळाला तर उच्च न्यायालयाने सरकारलाच जबाबदार धरले असून जलस्त्रोत संवर्धन आणि पाणीवाटप याबाबत सरकार आणि राज्य जलस्त्रोत संवर्धन नियंत्रण प्राधिकरणाच्या दृष्टिहीन भूमिकेवर न्यायालयाने बोट ठेवले आहे. एवढेच नव्हे, तर काहीही साध्य न झालेल्या जलसिंचन प्रकल्पावर पाण्यासारखे पैसे खर्च करुन काहीच साध्य झालेले नाही. तसेच गेल्या काही वर्षापासून पावसाचे कमी होत चाललेले प्रमाण लक्षात घेता सध्याच्या आणि भविष्यातील दुष्काळाच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सरकारने नेमक्या काय उपाययोजना केल्या आहेत असे विचारुन येत्या पाच दिवसात त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश सरकारला दिले आहेत. भविष्याचा विचार करुन जलस्त्रोत संवर्धन आणि त्याच्या वितरणाची योजना आखण्याची गरज आहे. भविष्यात दुष्काळग्रस्त परिस्थितीशी सामना करण्यासाठी सांडपाण्यावर पुनप्रक्रिया करुन त्याचा वापर पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी केला जाऊ शकतो असे प्राधिकरणाने न्यायालयाला सांगितले.

१६.आपत्कालीन परिस्थितीत एक व्यक्ती, कुटुंब, सामाजिक संस्था म्हणून आपल्याला करता येण्यासारख्या बाबी याप्रमाणे आहेत १) शहरी भागातून पाण्याचा कमीत-कमी वापर केला पाहिजे. पाणी अजिबात वाया जाऊ देऊ नये. २) आंघोळीसाठी दोन बादल्या पाणी पुरेसे आहे. आंघोळ शक्यतो बादलीत पाणी घेऊनच करावी. रोज फक्त एकदाच आंघोळ करावी हो प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. ३) आंघोळीचे पाणी एका ठिकाणी साठवून त्याचा वापर संडासात व बागेमध्ये करावा. त्याचप्रमाणे वॉशिंग मशीनमधील सरासरी ४० लिटर पाणी प्रत्येक वॉशनंतर बाहेर सोडले जाते. त्या पाण्याचा पुर्नवापर बगीचा, संडास यासाठी करावा. पाणी 'शिळे झाले' ही समजूत चुकीची आहे. फ्लशचा वापर अगदी गपजेपुरताच करावा. ४) घर, गाडी इ. ओल्या फडक्याने पुसून काढावी. नळ तोट्याची गळती थांबवावी. ५) शासकीय व

निमशासकीय तसेच घरगुतो व उद्योग व्यवसायासाठी वापरावयाच्या पाण्याचे रेशनिंग करावे. रेनवॉटर हार्वेस्टिंग योजना नव्या इमारतींबरोबरच जुन्य इमारतींनाही बसविणे अनिवार्य करावे. अशाप्रकारे संडपाण्यावर पुनप्रक्रिया करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

१७.दुष्काळावर मात करण्यासाठी जलक्षेत्रातील कार्यकर्ते निर्माण व्हायला हवेत. जे कार्यकर्ते व सामाजिक संस्था आन अशाप्रकारची कामे करतात त्यांची (माहिती) उदाहरणे इतरत्र सांगतली पाहिजे. आजच्या दुष्काळी परिस्थितीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी अनेक सामादिक संस्था नामवंत व्यक्ती संघटना लोकांना धीर देण्याचे व त्यांना मदत करण्याचे काम सामाजिक भावनेतून करत आहेत. याचा आदर्श सर्वांनी घेणे गरजेचे आहे.

१८. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना सल्ले देणाऱ्यांचे पीकच फोफावते. शेतकरी त्याच्या परिस्थितीनुसार शेतात काय पिकवायचे, कसे पिकवायचे, कुणासाठी, किती, कशापध्दतीने हे सर्व ठरवत असतो. त्याच्या हातात शेती अशली तरी निसर्गाचा लहरीपणा, बाजारपेठ नियंत्रण त्याच्या हातात नाही. शेती पिकली तरी आणि नाही पिकली तरी त्याचे मरण ठरलेलेच असते. अशा परिस्थितीत त्यांना काही मंडळी आणि सरकारसुध्दा काहीबाही सल्ले देत असतात. मुख्यमंत्री म्हणतात, 'मराठवाड्याचा पोपट होऊ देणार नाही', शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर असून पिण्याचे पाणी, शेतकऱ्यांना कर्ज, जनावरांना चारा-पाणी अशी सर्व प्रकारची मदत सरकारकडून दिली जाईल. मुख्यमंत्री व तमाम शासनकत्यांनी आणि अधिकाऱ्यांनी दुष्काळी भागाच्या 'सहलों' काढल्या, त्यातून त्यांना दुष्काळाची दाहकता (तीव्रता) समजल्याचे सांगितले. केंद्रिय पथकाने दुष्काळी दौरे केले. याचा परिपाक काय तर ऑक्टोबरच्या मध्यात महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात एकदाचा दुष्काळ जाहीर केला. त्यानुसार महाराष्ट्रातील एकूण १४७०८ गावे दुष्काळग्रस्त ठरले. त्यापैकी मराठवाड्यात ८५२२ गावे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झाले. पुढे काय? तर पॅकेज, कर्जमुक्ती, जलसंधारणाची कामे, आमचं गाव आमचा विकास असे संकल्प. राज्यसरकार केंद्रसरकारकडे मदत मागते. केंद्राने अद्यापही राज्याला मदत जाहीर केलेली नाही. सरकारच्या घोषणा आणि विरोधकांचा आक्रोश यामधून अजूनतरी दुष्काळी भागाच्या हातात फारसे काही पडलेले नाही.

१९.विदेशी भांडवलदारांना आमंत्रण देऊन देशात गुंतवणूकीसाठी आवाहन करण्यासाठी राज्यकर्ती मंडळी देशोदेशी जात आहेत. विदेशी भांडवलदारांना जरुर बोलवावे, पण त्यांच्या स्वागताची कमान मराठवाड्यासारख्या दुष्काळी भागात उभारली तर काय हरकत आहे? मागास भागातील सबसिडीचा काळ संपला की येथील कारखाने इतरत्र निघून जातात. तेव्हा सबसिडी घेतलेला कारखाना किमान २५ वर्षे येथून हलवू दिला जाणार नाही असा कायदा करायला हवा.

२०.दुष्काळाच्या संकटात शेतकरी आपल्या म्हणजे समाजाच्या संवेदनातून केवळ करुणेची अपेक्षा करीत आहे असे नाही तर एका सर्व प्रकारच्या मदतीसाठी निर्धाराची अपेक्षा करत आहे. केवळ प्रामाणिकपणाच नव्हे तर परिस्थितीचे भान येण्याची अपेक्षा ठेवत आहे. दुष्काळाच्या या परिस्थितीत तेच आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.

**संदर्भ :**

१. महाराष्ट्रातील कोरडवाहू शेती समस्या व उपाय, संपादक मा. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, प्रा.डॉ.ने.एफ. पाटील प्रकाशक-कॉ. गोविंग पानसरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर.२०१९.
२. विश्वाचे आर्त - अतुल देऊळगावकर, मनोविकास प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २८ ऑगस्ट २०१४
३. दुष्काळ आवडे सर्वांना, पी. साईनाथ अनुवाद हेमंत कर्णिक, अक्षर प्रकाशन, ७०, मुंबई, मार्च २०१८.
४. मराठवाड्यातील दुष्काळाचे दुष्टचक्र वास्तव आणि उपाय, संपादक प्रा. विनायक शिंदे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, फेब्रु. २०१५
५. डॉ. विलास खंदारे, मराठवाड्यातील दुष्काळ - मराठवाडा अर्थशास्त्र परिषद, राज्यस्तरीय चर्चासत्र, आयोजक दगडोजीराव देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बजाजनगर, वाळूज, औरंगाबाद..
६. सकाळ, लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स या दैनिक वर्तमानपत्रातील संपादकीय आणि वातांकने, बातम्या इ.
७. विविध वेबसाईट्स, दूरदर्शनवरील चर्चासत्र.
८. लोकराज्य, अर्थसंवाद, अर्थविचार, योजना इ. मासिके